# महात्मा गांधी यांचे सर्वोदयविषयक विचार

**डॉ. विद्याताई निवासराव जगताप**

---

**प्रस्तावना :** औद्योगिक क्रांतीमुळे समाजात भांडवलशाहीचा उदय झाला. भांडवलशाहीमुळे समाजात सुबत्ता व समृद्धी आली. पण त्याचबरोबर स्पर्धा, विषमता, हिंसा यासारख्या अनेक समस्याही निर्माण झाल्या. यातूनच समाजात उत्पादनाची मालकी असणारा व उत्पादनाची मालकी नसणारा असे दोन वर्ग तयार झाले ते म्हणजे एक भांडवलदार व दुसरा कामगार वर्ग होय. भांडवलदार वर्गाच्या हातात उत्पादनाची सर्व मालकी असल्याने हा वर्ग शक्तीशाली बनला व तो कामगार वर्गावर अन्याय, अत्याचार, जुलुम जबरदस्ती करू लागला. यामुळे मानवी जीवन जगणे असह्य झाले होते. या सर्वांपासून समाजाची मुक्तता करण्याच्या उद्देशाने मार्क्स आणि एंजल्स यांनी समाजसत्तावादाचा सिद्धांत मांडला. यातुनच समाजावादाचा नवा विचार समाजापुढे आला. पण साम्यवादातून एकाधिकारशाही आणि लष्करशाही निर्माण झाली. याद्वारे समाजात मोठ्या प्रमाणात हिंसेचा वापर होवू लागला.

पाश्चात्य देशामधील औद्योगिकरणातून आधुनिकतेचा जन्म झाला होता. याचे मानवी समाजजीवनावर अनेक परिणाम घडून आले. त्यामुळे व्यक्तिमध्ये स्वार्थी, लोभी, सत्तेची लालसा असणारी वृत्ती वाढत गेली. तसेच हिंसा, क्रौर्य, लुबाडणूक व साधनसंपत्तीचा अती हव्यास याही प्रवृत्तीही वाढल्या. साम्यवादात फक्त कारखान्यात काम करणाऱ्या कामगारांचाच विचार केला गेला असल्याने त्यामुळे समाजात, समानता, एकाता, बंधुत्त्व जपणारे घटक नष्ट झाले. राज्यकर्त्यांच्या केंद्रीय सत्तेमुळे सर्वसामान्य वर्ग गुलामगिरीच्या विळख्यात सापडला होता. माणसाजवळील माणूसकीबरोबरच एकमेकांवरील विश्वासही नष्ट झाला. तसेच धन, संपत्ती, पैसा व प्रतिष्ठा यामुळे राजकीय, सामाजिक, अध्यात्मिक व नैतिक क्षेत्रात समाजशीलतेचा अभाव निर्माण झाला होता.

समाजातील अशा अनेक समस्यांवर विचार करून उपाययोजना करण्याची गरज निर्माण झाली होती, याच सुमारास वसाहतवादानेही अनेक देशांना गुलाम बनविले होते.

भारतात ब्रिटीशांनी आपली सत्ता बळकट केली होती. तशीच ती दक्षिण आफ्रिकेतही केली होती. तेथील वर्णभेदी सरकार भारतीयांच्या बाबतीत भेदभाव करत होते, त्याच्यावर अन्याय करत होते. वकिली करण्यासाठी तेथे गेलेल्या मोहनदास करमचंद गांधी यांनी या अन्यायाविरोधात अहिंसक प्रतिकाराचे साधन म्हणून सत्याग्रह सुरू केला होता.

महात्मा गांधींनी दक्षिण आफ्रिकेत असताना भारताच्या भविष्याचे स्वप्न १९०९ साली लिहलेल्या 'हिंद स्वराज्य' या पुस्तकात रेखाटले. स्वराज्याचे अंतिम ध्येय काय असावे? याचेही ते चिंतन करत होते. या चिंतनातून त्यांना एक मार्ग सापडला तो म्हणजे 'सर्वोदय' होय

**उदिष्ट्य :-** आज समाजव्यवस्थेत अनेक प्रकारच्या समस्या निर्माण झाल्या आहेत. वाढत्या लोकसंख्येला मूलभूत गरजांची पूर्तता होवू शकत नाही. समाजात सत्ताधारी प्रतिनिधी आणि श्रीमंत या मुठभर व्यक्तींच्या विकासाचा प्रयत्न होतो. श्रीमंत अधिक श्रीमंत होत चालले आहेत तर गरीब अधिक गरीब होत आहेत. त्यामुळे समाजात आर्थिक विषमतेची दरी अधिक प्रमाणात रुंदावत चाललेली आहे. या पार्श्वभूमीवर महात्मा गांधीजी यांचा सर्वोदयाचा विचार समजावून घेणे आणि त्याचा अभ्यास करणे हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवण्यात आले आहे.

**गृहितक :-** आज समाजात आर्थिक, राजकीय क्षेत्रात समता प्रस्थापित व्हावी म्हणून मोठया प्रमाणात सामाजिक बदलाचे प्रयत्न चालू आहेत. परंतु वाढतीजीवघेणी स्पर्धा, हिंसा, संघर्ष यांना नियंत्रित करण्यासाठी महात्मा गांधी यांचे 'सर्वोदय' समाजरचनेचे विचार अत्यंत आवश्यक आहेत.

**अ) सर्वोदयाचा उदय**

भारतातील प्राचीन साहित्यात सर्वोदयाचा उल्लेख आढळतो. आचार्य सामंतभद्रमुनीच्या लेखनातून सर्वोदयाचा विचार व्यक्त झाला आहे. महात्मा गांधींनी आचार्य सामंतभद्र यांच्या लेखनातूनच सर्वोदयाचा उच्चार सर्वप्रथम केला. तो उच्चार म्हणजे "सर्वेन सुखीन संतुः" या वाक्यावरून प्राचीन काळातही सर्वोदयाचा विचार अस्तित्वात होता. परंतु प्रत्यक्ष व्यवहारात त्याचा वापर होत नव्हता, असे दिसते.

गांधी दक्षिण आफ्रिकेत होते तेव्हा त्यांनी अनेक थोर विचारवंताचे साहित्य वाचले होते. त्यामधील बऱ्याच साहित्यांचा त्यांच्यावर प्रभावही पडला होता. यामध्ये जॉन रस्कीन, टॉलस्टॉय, थोरो यांचा समावेश होतो. एकवेळी

गांधीजी दक्षिण आफ्रिकेत जोहान्सबर्गहून डरबनला रेल्वेने जाणार होते. तेव्हा जोहान्सबर्ग स्टेशनवर गांधीजींना त्यांच्या पोलाक या मित्राने एक लहानसे पुस्तक प्रवासात वाचण्यासाठी दिले होते. गांधीजींनी हे पुस्तक जोहान्सबर्ग ते डरबन या २४ तासाच्या प्रवासात वाचून काढले. हे पुस्तक म्हणजे जॉन रस्कीन यांचे 'Unto This last'हे होय. या पुस्तकाबाबत गांधीजी असे सांगतात की, "या पुस्तकातज्या ध्येयवादाचा पुरस्कार केला होता. त्याप्रमाणे स्वतःचे जीवन सुरू करण्याचा मी ताबडतोब निश्चय केला." या पुस्तकातील विचाराने गांधीजी एवढे प्रभावित झाले की, त्यातील विचार प्रत्यक्षात आणण्याच्या दृष्टीने त्यांनी विचार करण्यास सुरुवात केली होती.

Unto This last पुस्तकाची पार्श्वभूमी ही बायबल या ग्रंथामधील आहे. या ग्रंथात समाजातील शेवटच्या / अंत्याच्या घटकाचा विचार मांडला आहे. येथे अंत्याच्या उदयासंबंधी एक उदाहरण स्पष्ट केले आहे ते म्हणजे एका द्राक्षाच्या बागेतील कामासाठी काही मजूर एकपेनी (पैसे) मजूरी करारावर त्या बागेत काम करत होते. त्यानंतर दुपारच्या वेळेस काही बेकार मजूर बागेच्या आसपास फिरताना त्या बागेच्या मालकास दिसले त्यांनी त्या बेकारांना बोलावून आपल्या बागेत काम दिले. त्यानंतर काही वेळाने आणखी बेकार मजूर त्यांना फिरताना दिसले. त्यांनाही बाग मालकाने जागेत काम दिले. काम संपल्यावर बागेच्या मालकाने सर्वांना समान एक-एक पेनी पगार दिला. यामध्ये लवकर आणि उशिरा आलेल्यांचाही समावेश होता. मजुरी देण्याच्या या पद्धतीत मानवता आणि समानता याचे अद्वैत तत्त्व समाविष्ट करण्यात आले होते. याच तत्त्वावर आधारित Unto this last हे पुस्तक जॉन रस्कीन यांनी लिहिले आहे. यामध्ये अंत्याच्या उदयाचा विचार सर्वप्रथम मांडला आहे.

'Unto This Last'या पुस्तकातील अंत्याच्या उदयाच्या विचाराने गांधीजी प्रभावित झाले होते. या पुस्तकातील विचार प्रत्यक्षात आणण्यासाठी त्यांनी 'Unto This Just'या पुस्तकाचा गुजराती भाषेत अनुवाद केला आणि त्यास 'अंत्योदय' असे नाव दिले. यामध्ये अंत्याच्या उदयाचा विचार महत्त्वाचा होता. तसेच अंत्याबरोबरच सर्वांचा विचार होणेही गरजेचे होते. याबाबत गांधीचे असे मत होते की, "हे पुस्तक लिहण्याचा उद्देश सर्वांचे कल्याण, उदय, उत्कर्ष हा असल्याने मी 'सर्वोदय' असे नाव दिले आहे."सर्वांचाच उदय झाला पाहिजे. या विचाराला प्राधान्य देवून अंत्योदयातून सर्वोदयाचा जन्म झाला. यामध्ये सर्वोदयाचा अर्थ समजावून घेणे गरजेचे आहे.

**सर्वोदयाचा अर्थ**

सर्वोदयाचा उदय असा जरी सर्वोदयाचा लहान वाक्यातून अर्थ असला तरी त्यांची व्यापकता फार मोठी आहे. "सर्व भूत-हिताय" असा गांधीनी सर्वोदयाचा अर्थ स्पष्ट केला आहे. सर्व +उदय= सर्वोदय यामधील 'सर्व शब्दात केवळ मानवाच्या उदयाचा विचार नसून संपूर्ण पृथ्वीवरील सजीवांचा मानवाशीसंबंध आहे त्यांच्याही उदयाचा समावेश करण्यात आला आहे. या सर्व मानवप्राण्यांचा विकास म्हणजे सर्वोदय होय. यादृष्टीने प्रथम गांधीजींचा सर्वोदयाचा विचार समजावून घेणे गरजेचे आहे.

**२. महात्मा गांधी यांचा सर्वोदय विचार**

गांधीजीच्या अंत्योदयाच्या संकल्पनेतूनच सर्व समाजाच्या उदयाच्या कल्याणाच्या हेतूने सर्वोदयाचा विचार पुढे आला. गांधीजींनी सांगितलेला तो सर्वोदयाचा सिद्धांत पुढील प्रमाणे सांगता येईल.

१. सर्वांच्या कल्याणात आपले कल्याण आहे.

२. वकील काय किंवा न्हावी काय दोघांच्या कामाची किंमत सारखीच असली पाहिजे.

पोटापाण्याचा हक्क दोघांनाही सारखाच आहे.

३. "साधे अंगमेहनतीचे शेतकऱ्यांचे जीवन हेच खरे जीवन होय."

या सिंद्धांतानुसार गांधीनी सर्वांच्या विकासाचा विचार मांडला आहे. सर्वांच्या कल्याणाच्या उद्देशाने प्रत्येकाने एक दुसऱ्याच्या सुख-दुःखाचा विचार केला पाहिजे. दुसऱ्याच्या सुखात स्वतःच्या सुखाचा आनंद घेतला पाहिजे. प्रत्येकाला उदरनिर्वाहाचा समान अधिकार असल्याने कोणालाही त्याचा कामाच्या स्तरानुसार उच्च-नीचतेची वागणूक दिली जावू नये. तर प्रत्येकाला समान वागणूक देणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांचे किंवा श्रम अंगमेहनतीचे काम जो करून जीवन जगत असतो तेच वास्तविक खरे जीवन असते. असा गांधीजींचा सर्वोदय सिद्धांत आहे. या सिद्धांतानुसार समाजात समानता निर्माण होवू शकेल. असा गांधीना विश्वास वाटत होता.

समाजाला उपलब्ध असलेल्या भौतिक, आर्थिक व अध्यात्मिक कल्याणाच्यादृष्टीने अधिकाधिक उपयोग करून घेण्याचे सर्वोदय हे शास्त्र आहे. असे गांधीजी सांगतात. 'अधिकतम लोकांचे अधिकतम सुख'या उपयुक्तता

वादाच्या तत्त्वापेक्षा सर्वोदयाचे उदिष्ट अधिक व्यापक आहे. उच्च आणि नीच, समर्थ आणि असमर्थ बुद्धीमान आणि मंदबुद्धी या सर्वांचाच अभ्युदय सर्वोदयात समाविष्ट आहे. प्रत्येक व्यक्तीचे हिव आणि सार्वजनिक हित यांच्यातील अद्वैत सर्वोदयाने गृहित धरले आहे. 'जगा आणि जग् द्या'या तत्वापेक्षा उच्च 'इतरांसाठी जगा' या तत्त्वज्ञानाचा समावेश सर्वोदयात केला आहे. मानव हा मुलतः त्यागी, शांतताप्रेमी आणि दुसऱ्यावर उपकार करण्यास तत्पर अशा वृत्तीचा आहे. मात्र सामाजिक परिस्थितीच्या परिणामातून हे गुण लुप्त होत आहेत. म्हणून ही परिस्थिती बदलल्यानंतर सर्वोदय विचाराचा समाज अस्तित्वात येवू शकतो.

गांधींना सर्वोदय समाज स्थापन करायचा होता. श्रमनिष्ठा, स्वावलंबन, स्वदेशी, स्वायत्त, ज्ञान, यज्ञ, दान, तप, सहकार्य व स्थानिक स्वराज्य या मार्गाचा वापर केल्यास हिंसा नष्ट होवून शकते. यावरूनच त्यांनी अहिंसेबाबत सर्वोदयाचे दोन सिद्धांत सांगितले आहेत. ते पुढीलप्रमाणे,

"१. अनितीमय अहिंसक क्रांतीच्या मार्गाने स्वराज्य मिळू शकत नाही.

२. स्वराज्य मिळाल्यावर अनितिमय मार्गाने विकास होवू शकत नाही."

गांधीजींना स्वराज्य प्राप्तीसाठी अहिंसक मार्ग योग्य वाटत होता. त्यामुळे शांततामय। अहिंसक मार्गाने मिळालेले स्वातंत्र्य त्यांना अभिप्रेत होते, अनिती आणि अहिंसक मार्गाचा अवलंब करून मिळालेले स्वातंत्र्य फार काळ टिकू शकणार नाही. तसेच अशा स्वातंत्र्यात जनतेचा विकास होणार नाही असे गांधींना वाटत होते.

गांधीनी श्रमनिष्ठा मानणारी स्वयंशासित स्वतंत्र, स्वायत्त समाजाची कल्पना सर्वोदयात मांडली. त्यासाठी प्रत्येकाने आपल्या गरजा कमीत-कमी करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. यंत्राचा कमीत कमी वापर करणे आणि जे मोठे अवजड उद्योग आहेत.सामुहिक मालकीद्वारे नियंत्रण प्रस्तापित केले पाहिजे. स्वावलंबी समाजात लहान-सहान उद्योग निर्माण करून आपल्या गरजा त्याद्वारे भागविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. गरजांच्या पूर्तीसाठी आवश्यक अशा उत्पादन घटकांची निर्मिती केल्याने समाज स्वयंपूर्णतेच्या पायावर उभा राहिल. समाजात असणारी सर्व साधनसंपत्ती, सामर्थ्य हे लोकांच्या कल्याणासाठी वापरल्यास स्वयंपूर्ण आणि स्वावलंबी असा सर्वोदय समाज निर्माण होवू शकतो. सहकार, लोकशाही सत्तेचे विक्रेंद्रीकरण, ग्रामीण लोकांचे हितसंवर्धन करणे या घटकांना सर्वोदयात महत्त्वाचे स्थान देण्यात आले. गांधींजींना सर्वोदयाच्या माध्यमातून संपूर्ण मानवजातीच्या कल्याणाचे स्वप्न साकारायचे होते. परंतु गांधीना ते शक्य झाले नाही. तरीही उत्तर गांधीवाद्यांनी सर्वोदय विचाराच्या प्रचारासाठी गांधींच्या मृत्यूनंतर महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांनीच सर्वोदयाच्या विकासासाठी प्रयत्न केला आहे.

**निष्कर्ष :-**

सद्य: कालिन समाजात प्रत्येकजण आपल्या स्वार्थाचा विचार करत आहे. प्रत्येक गोष्ट आपल्यालाच मिळाली पाहिजे यादृष्टीने सर्वांची धडपड चालू आहे. त्यामुळे बहुतांग वर्ग हे मूलभूत मानवी गरजा आणि विकास यापासून वंचीत राहिलेला आहे. राज्यकर्ता वर्ग तर आपल्याशी संबंधित असणाऱ्याच्याच, विकासाचा संकुचित दृष्टिकोन राबवतो. अल्पसंख्यांकावर बहुसंख्य वर्गाकडून शोषण अन्याय अत्याचार केले जातात. त्यामुळे हा तळागाळातील हा वर्ग विकासाच्या प्रक्रियेपासून लांब राहिलेला आहे. तेंव्हा अठरा विश्व दारिद्र्य असणारी ही समाजव्यवस्था बदलने गरजेचे आहे आणि याला पर्यायी समाजव्यवस्था निर्माण करण्याची ताकद महात्मा गांधांनी सांगितलेल्या सर्वोदय विचारात सापडते. यामध्ये कनिष्टापासून वारीष्टांपर्यंतच्या विकासाचा विचार मांडल्या. श्रमदान श्रेष्ठ मानले आहे, राज्यकर्ता, शासन यांची गरज नसणारा शासनमुक्त समाज निर्माण होवू शकतो. म्हणून महात्मा गांधींच्यासर्वोदय विचारातून नवसमाज निर्माण स्थापन करणेगरजेचे आहेत.

**संदर्भ सूची :** १) अग्रवाल, गंगा प्रसाद: (२००८) (साम्ययोग साधना है नव्या युगाच्या निर्मितीच्या दिशा: सर्वसेवासंघ प्रकाशन राजघाट वाराणसी.

२) गांधी, मो के : (१९५२) साप्ताहिक हरिजन

३) कुमारप्पा भारतन (संपा):(१९५५), सर्वोदय, (गांधीजी), नवजीवन प्रकाशन मंदिर अहमदाबाद.

४) भावे विनोबा : (१९८९), सर्वोदय विचार आणि स्वराज्यशास्त्र, परंधाम प्रकाशन, पवनार, वर्धा.

५) Gandhi M. K. :(1956) Ruskin"UntoThis Last"a paraphrase translated from Gujarati NavjivanPrakashan, Ahmedabad.

६) देव शंकरराव, (अनु) (२००३),सर्वोदय (जॉन रस्कीन लिखित 'Unto This last') मंजूळ प्रकाशन पुणे.